# जिल्हाधिकारी कार्यालय, बीड (आस्थापना शाखा)

फोन क्र.02442/222604 ई-मेल:- bmkamble.rdcbeed@gmail.com फॅक्स क्र.02442/222011


## महाराष्ट्र शासन - महसूल विभाग

### जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड.

### विशेष पदभरती मोहिमेअंतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गातील गट क व ड संवर्गाची पदभरती 2019.

जाहिरात क्रमांक-2019/आरबी-डेस्क/1/आस्था/1/कावि-552 दिनांक. 27/12/2019.

(1) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.प्रनिमं 1216/प्र.क्र.65/16/13-अ दिनांक 13 जून 2018 तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक.बीसीसी 2018/प्र.क्र.308/16 ब दिनांक 21/12/2019 नुसार निर्देशित केलेनुसार बीड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आस्थापनेवरील लिपिक-टंकलेखक,शिपाई व उपविभागीय अधिकारी यांचे आस्थापनेवरील तलाठी संवर्गातील अनुसुचित जमाती या प्रवर्गातील आरक्षीत असलेली पदे विशेष भरती मोहिमेअंतर्गत सरळसेवेने भरण्याकरीता खाली नमुद केलेल्याप्रमाणे संवर्गातील, **अनुसुचित जमातीच्या जातवैधता प्रमाणपत्र धारक उमेदवारांकडून** या जाहिरातीव्दारे दिनांक 06/01/2020 पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत.

(2) **पदांचा तपशील:-**

(1) **लिपीक-टंकलेखक संवर्ग रिक्त पदे (सुधारीत वेतन मॅट्रीक्स मधिल वेतन स्तर- S- 6:19900-63200).**

| अ.क्र | प्रवर्ग | सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षणानुसार भरावयाची पदे | | | | | | संमातर आरक्षणा शिवायची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सै. | अंशकालीन पदवीधर/पदविकाधारक | प्रकल्प -ग्रस्त | भुकंप-ग्रस्त | खेळाडू | |
| 1 | अ.ज | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |

(2) **तलाठी संवर्ग रिक्त पदे (सुधारीत वेतन मॅट्रीक्स मधिल वेतन स्तर S- 8:25500-81100).**

| अ.क्र | प्रवर्ग | सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षणानुसार भरावयाची पदे | | | | | | संमातर आरक्षणा शिवायची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सै. | अंशकालीन पदवीधर/पदविकाधारक | प्रकल्प -ग्रस्त | भुकंप -ग्रस्त | खेळाडू | |
| 1 | अ.ज | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |

(3)**शिपाई संवर्ग रिक्त पदे (सुधारीत वेतन मॅट्रीक्स मधिल वेतन स्तर S-1: 15000-47600).**

| अ.क्र | प्रवर्ग | सामाजिक आरक्षण | समांतर आरक्षणानुसार भरावयाची पदे | | | | | | संमातर आरक्षणा शिवायची पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला | माजी सै. | अंशकालीन पदवीधर/पदविकाधारक | प्रकल्प -ग्रस्त | भुकंप -ग्रस्त | खेळाडू | |
| 1 | अ.ज | 2 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 |

(3) **शैक्षणिक अर्हता:-**

**जाहिरातीतील पदासाठी खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता दिनांक 27.12.2019 रोजी धारण करणे**

# जिल्हाधिकारी कार्यालय, बीड (आस्थापना शाखा)

फोन क्र.02442/222604 ई-मेल:- bmkamble.rdcbeed@gmail.com फॅक्स क्र.02442/222011


**आवश्यक आहे.**

| अ.क्र. | संवर्ग | किमान शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| 1 | लिपीक-टंकलेखक /कनिष्ठ-लिपीक | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कुठल्याही शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण तसेच शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून जाहीर केलेली अर्हता.<br>ब) टंकलेखनाची शासकीय वाणिज्य मंडळाची प्रमाणपत्र परीक्षा<br>मराठी 30 शब्द प्रति मिनीट किंवा इंग्रजी 40 शब्द प्रति मिनीट उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. (शासन मान्य व्यावसायिक प्रमाणपत्र आवश्यक) (शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक निवक-1010/प्र.क्र.8/2010/16-अ,दिनांक 06/10/2010 नुसार भूकंपग्रस्त, प्रकल्पग्रस्त, स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य, सन 1991 चे जनगणना कर्मचारी, सन 1994 नंतरचे निवडणूक कर्मचारी व पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या घटकातील उमेदवारांना मराठी/इंग्रजी टंकलेखनाची परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून सहा महिने इतक्या कालावधीमध्ये तसेच माजी सैनिक उमेदवारांनी नियुक्ती दिनांकापासून अकरा महिने इतक्या कालावधीमध्ये सदर प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील.)<br>क) मराठी, हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील.<br>ड) महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान(सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र.मातंस2012/प्र.क्र.277/39, दि.04.02.2013 मध्ये नमुद केलेनुसार संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र.प्रशिक्षण 2000/प्र.क्र.-61/2001/39 दि.19.03.2003 अन्वये संगणकाची अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून 02 (दोन) वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहील. |
| 2 | तलाठी | अ) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कुठल्याही शाखेतील पदवी परीक्षा उत्तीर्ण तसेच शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून जाहीर केलेली अर्हता.<br>ब) मराठी, हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील.<br>क) महाराष्ट्र शासन, माहिती तंत्रज्ञान(सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्र.मातंस2012/प्र.क्र.277/39 दि.04.02.2013 मध्ये नमुद केलेनुसार संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णयक, प्रशिक्षण 2000/प्र.क्र.-61/2001/39 दि.19.03.2003 अन्वये संगणकाची अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून 02 (दोन) वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहिल. |
| 5 | शिपाई | एसएससी उत्तीर्ण व मराठी भाषा लिहीता वाचता येणे आवश्यक. |

(4) वयोमर्यादा:-

सर्वसाधारणत: दिनांक 27/12/2019 रोजी उमेदवाराचे वय सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दिनांक 25.04.2016 प्रमाणे वय वर्ष 18 पेक्षा कमी व 43 पेक्षा जास्त नसावे.

| | |
|---|---|
| पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार | शासन निर्णय 2 जानेवारी 2019 नुसार 55 वर्ष |

| | |
|---|---|
| माजी सैनिक उमेदवार | सशस्त्र दलात किमान 06 महिने केलेल्या माजी सैनिकामधील त्यांनी सशस्त्र दलात केलेला अखंड सेवाकाल +03 वर्ष एवढा काल त्यांच्या विहित दिनांकाच्या वयातून वगळून त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल. अपंग माजी सैनिकासाठी वयोमर्यादा 45 वर्षापर्यंत राहील. |

(5) **परीक्षा शुल्क (फी)** :- लिपीक-टंकलेखक, तलाठी, व शिपाई पदासाठी शुल्क - **रु. 150/-**

प्रत्येक पदासाठी वेगळे शुल्क भरणे अनिवार्य आहे. माजी सैनिक यांना शुल्क देय नाही.

**उक्त परीक्षा शुल्क जिल्हाधिकारी बीड यांचे नावाने बीड शाखेला देय असलेला राष्ट्रीयकृत बँकेचा मागणी धनाकर्ष (DD) अर्जासोबत सादर करणे बंधनकारक राहील.**

**(6) टीप :-**

1. मा. न्यायालयाचे आदेश / शासनाचे आदेश किंवा जिल्हा निवड समितीच्या निर्णयानुसार सदरच्या जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या रिक्त पदाच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. तसेच काही अपरिहार्य कारणाने परीक्षेत बदल झाल्यास किंवा परीक्षा स्थगित/रद्द झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदाची संख्या, समांतर आरक्षण व सामाजिक आरक्षण याबाबत बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे तसेच सेवा भरती प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार जिल्हा निवड समिती बीड स्वत:कडे राखून ठेवत आहे. सदर भरती प्रक्रियेसंदर्भात उद्भवणारे वाद, तक्रारी इत्यादीबाबत सदर समितीचा निर्णय अंतिम राहील.
2. महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्र. असंक/1025/प्र.क्र.21/भाग दिनांक 24/01/2006 अन्वये शासनाने विभागीय स्तरावर निर्माण केलेले अतिरिक्त संवर्ग कक्षाकडे उमेदवार उपलब्ध झाल्यास त्याप्रमाणे पदे कमी होण्याची शक्यता आहे.
3. महिला व बालकल्याण विभागाचे शासन निर्णय क्रं. 82 /2001/अशेआ-2000/प्रक्र 415/का-2 दि.25/05/2001 मधील तरतुदी नुसार महिलांचे आरक्षण दर्शविण्यात आलेले आहे.
4. समांतर आरक्षण हे फक्त सरळसेवा भरतीस लागू राहील. समांतर आरक्षण हे सामाजिक आरक्षणांतर्गत आरक्षण असल्याने त्यास सामाजिक आरक्षणावर वाढीव म्हणून गणण्यात येणार नाही.
5. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, प्रानिमं-2007/प्र.क्र.46/07/13-अ,दिनांक 27/06/2008; प्रानिमं-1214/प्र.क्र.(43/14)13-अ, दिनांक 05.06.2014 व प्रानिमं-1215/(प्र.क्र.55/15)/13-अ, दिनांक 05.10.2015 व शासन सामान्य प्रशासन विभागा कडील परिपत्रक क्र.एसआरव्ही-1097/प्र.क्र.31/98/16अ दि.16.03.1999 आणि शासन सामान्य प्राशासन विभागाकडील परिपत्रक क्रएसआरव्ही,1012/प्र.क्र.16/12/16-अ, दि13.08.2014 व दिनांक 13.06.2018 मधील तरतुदीनुसार अंतिम निवड करण्यात येईल.

**7. अर्ज करण्याची पध्दत: -**

1. प्रस्तूत परीक्षेसाठी अर्ज ऑफलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत.
2. जिल्हाधिकारी कार्यालय बीड यांचे कार्यालयात दि.06/1/2020 रोजी सायं. 5.45 वाजेपर्यंत ऑफलाईन पध्दतीने समक्ष अथवा टपालाने पोहचतील अशा बेताने अर्ज सादर करावेत. मात्र टपाल/ कुरिअरच्या विलंबामुळे उशिराने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

फोन क्र.02442/222604 ई-मेल:- bmkamble.rdcbeed@gmail.com फॅक्स क्र.02442/222011


3. सदर भरतीची जाहिरात व अर्जाचा नमुना www.beed.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
4. अंतिम दिनांका नंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा भरतीप्रक्रियेसाठी विचार केला जाणार नाही.
5. महिला उमेदवारांनी पूर्वाश्रमीच्या नावाने (By Birth) अर्ज करणे आवश्यक आहे.

8. **अटी व शर्ती** :-

1. उमेदवाराचे अर्ज ऑफलाईन पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्र, अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.तसेच अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. अर्ज भरताना काही त्रुटी राहील्यास अथवा चुकीची माहिती भरल्याने अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. तसेच अर्ज भरताना खोटी माहिती भरल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित उमेदवारावर फसवणूकीचा फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल. व गुणानुक्रमे गुणवत्ता यादीत आल्यास त्याचा दावा फेटाळाण्यात येईल.
2. उमेदवाराची लेखी परीक्षा ही कोणत्याही कागदपत्राची पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्यामूळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवाराची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक/समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल.
3. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा व त्याबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र त्यांचेकडे असणे आवश्यक आहे. अर्जदार यांचेकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन महसूल व वन विभागाकडील निर्णय दिनांक 27 जून 2011 नुसार त्यांचेकडे महाराष्ट्र राज्यात जन्म झालेबाबतचा पुरावा असणे आवश्यक आहे.
4. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रं. मकसी-1007/प्रक्रं.36/का/36 दि 10 जुलै 2008 नुसार महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील दावा केलेल्या 865 गावातील 15 वर्षापासून रहिवाशी असल्याचा त्यांच्या वास्तव्यांचा सक्षम प्राधिका-यांचा विहीत नमुन्यातील दाखला लेखी परिक्षेनंतर गुणवत्ता यादीमध्ये येणाऱ्या उमेदवारांना सादर करणे अनिवार्य आहे.
5. उक्त पदांसाठी आवश्यक अर्हता असणारा महाराष्ट्र राज्यातील कोणताही उमेदवार अर्ज करु शकेल.
6. उमेदवारांना कागदपत्र तपासणीच्या वेळी मूळ प्रमाणपत्रे व त्यांच्या साक्षांकित प्रती सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवाराने प्रमाणपत्र मिळणेकरिता सादर केलेल्या अर्जाच्या पावत्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत. छाननीअंती प्रमाणपत्रांमध्ये त्रुटी आढळल्यास/ माहिती खोटी आढळल्यास संबंधित उमेदवारास भरती प्रक्रियेमधून बाद करण्यात येईल व नियुक्ती दिली जाणार नाही.
7. उक्त पदासाठी लेखी परिक्षेकरिता पात्र ठरलेल्या उमेदवारांची यांदी www.beed.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात होईल.
8. लेखी परीक्षेचे प्रवेश पत्र जिल्हाधिकारी कार्यालय बीड या ठिकाणी दि.10 जानेवारी व 11 जानेवारी 2020 या दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध करुन देण्यात येतील. प्रवेशपत्र हस्तगत करण्यासाठी उमेदवार यांना स्वत: हजर राहावे लागेल.
9. उमेदवार यांनी अर्जासोबत दोन पासपोर्ट साईझ फोटो प्रवेशपत्राकरिता अर्जासोबत जोडून द्यावेत.
10. कोणत्याही उमेदवारास पोस्टाव्दारे किंवा अन्य मार्गाने प्रवेशपत्र पाठविले जाणार नाही. त्यामुळे प्रवेशपत्र उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील.
11. प्रवेश पत्राशिवाय कोणत्याही उमेदवारास परीक्षा कक्षात प्रवेश दिला जाणार नाही.
12. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र या कार्यालयात नाव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी विहित

नमून्यात स्वंतत्रपणे रितसर अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

13. विहीत वयोमर्यादेतील इच्छुक शासकीय/निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.
14. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचीत जमाती , विमूक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग, इतर मागासवर्ग यांचेसाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र.08) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.अ,भजब,भजब, भजक,भजड, विमाप्र,व इमाव यांना लागू आहे, त्यानुसार उक्त प्रवर्गातील उमेदवारांनी शासन परिपत्रक क्र.सीबीसी10/2006/प्र.क्र.15/मावक5 दिनांक 30 जून2006 मधील सोबतच्या नमुन्यात वर्ष 2019-2020 ह्या (चालु वित्तीय वर्षाचे) कालावधीकरिता म्हणजे दि.31/03/2020 पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमिलेअर) सक्षम प्राधिकारी यांचेकडील प्रमाणपत्र हे मुळ कागदपत्रांच्या छाननी वेळी सादर करणे बंधकारक आहे. नॉन क्रिमीलीअरचे तत्व अनुसूचित जाती/जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागासप्रगवर्गांना लागू राहील.
15. उक्त नमूद पदासाठी घेण्यात येणाऱ्या लेखी परीक्षेमध्ये गुणवत्ता यादीत येणाऱ्या उमेदवारांना त्यांचे पदासाठी आवश्यक असणारे कागदपत्र पडताळणीच्या वेळी त्यांचे शैक्षणिक अर्हता, टंकलेखन प्रमाणपत्र, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, संगणक हाताळणी अर्हता प्रमाणपत्र, जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्र, शासकीय /निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या विभागप्रमुखांच्या परवानगीने भरले असल्यास अशा परवानगीचे पत्र व इतर आवश्यक सर्व मुळ कागदपत्र सादर करणे अनिवार्य आहे. तसेच महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील परिपत्रक दिनांक 1/7/2005 व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम 2005 नुसार विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन विवाहित/अविवाहित उमेदवारांनी सादर करणे अनिवार्य आहे.
16. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.प्रशिक्षण 2000/प्र.क्र.61/2001/39 दि.19 मार्च 2003 नुसार गट क संवर्गातील उमेदवारांना त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाचे आत शासनाने ठरवून दिलेली संगणक अर्हता पीरक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील, अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त होतील.
17. शासन वित्त विभाग निर्णय क्र.अनियो/10/05/126/सेवा4/दि.31.10.2005 नुसार दि.1 नोव्हेंबर 2005 रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवाराचा नवीन परिभाषीत अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू राहील, त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे म.ना.से (निवृत्तीवेतन) नियम 1982 व म.ना.से. (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम 1984) आणि सद्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.
18. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
19. उमेदवाराने निवड प्रक्रियेच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची शिफारस अथवा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.
20. अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली, म्हणजे लेखी परिक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे, असे उमेदवारांनी समजू नये.
21. प्रवेशपत्र घेण्यासाठी लेखी परिक्षा व कागदपत्र पडताळणीसाठी येण्या-जाण्याचा खर्च उमेदवारांना स्वत: करावा लागेल.
22. जिल्हा निवड समितीने तयार केलेल्या अंतिम निवडसूची व तिची कालमर्यादा शासन निर्णय दि.13 जून 2018 नुसार राहिल.
23. नियुक्तीचे टिकाणी उमेदवारांना स्वखर्चाने जाऊन हजर होणे अनिवार्य आहे.
24. तलाठी पदाकरिता अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना प्रथम सहा महिन्यांचे प्रशिक्षण देण्यात येईल. सदरच्या

फोन क्र.02442/222604 ई-मेल:- bmkamble.rdcbeed@gmail.com फॅक्स क्र.02442/222011

कालावधीमध्ये ते परिविक्षाधीन कर्मचारी म्हणून गणले जातील व सदरचे प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतरच त्यांना तलाठी पदावर नियमित पदस्थापना संबंधित उपविभागीय अधिकारी यांचेमार्फत देण्यात येईल.

## 9. समांतर आरक्षणांतर्गत असलेल्या कोट्यासाठी अटी व शर्ती:-

**अ) महिला उमेदवारांसाठी:-**

1. मागासवर्गीय प्रवर्गातील विजाअ, भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व. तसेच खुल्या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलांचे 30 टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. (फक्त अनु.जाती व अनु. जमाती वगळुन)
2. मागासवर्गीय प्रवर्गातील विजाअ, भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इमाव तसेच खुल्या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती अथवा गटात मोडत नसलेल्या महिला सदस्यांनी महिलांच्या 30 टक्के आरक्षणासाठी सक्षम प्राधिकारीयांचे दि.31.3.2020 पर्यंत वैध असलेले नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्राची प्रत, मुळ कागदपत्रांच्या प्रती छाननी वेळी सादर करणे बंधनकारक राहील.
3. समांतर आरक्षणातील उमेदवार प्राप्त न झाल्यास त्या-त्या प्रवर्गातील सामाजिक प्रवर्गातुन सर्वसाधारण पात्र उमेदवार यांचा गुणवत्तेनुसार विचार होऊ शकतो.

**ब) अंशकालीन उमेदवारासाठी:-** अंशकालीन उमेदवारांचे बाबतीत त्यांनी सुशिक्षीत बेरोजगार अर्थसहाय्य योजनेअंतर्गत कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये 03 वर्षापर्यंत दरमहा मानधनांवर काम केलेले पाहीजे. तसेच सदरच्या अनुभवाची नोंद रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये केलेली असली पाहिजे. निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अनुभवाची सेवायोजन कार्यालयाकडील प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

**क) माजी सैनिक उमेदवारासाठी:-** गुणवत्तायादीमध्ये येणाऱ्या माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत, डिस्चार्ज बुकची मुळ प्रत व इतर आवश्यक कागदपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक आहे.

| आहे. | पदाचे नाव | स्वरूप | एकुण | |
|---|---|---|---|---|
| | | | प्रश्न | गुण |
| 1 | लिपीक-टंकलेखक | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक 13 जून 2018 मध्ये नमूद केल्याप्रमाणे | 100 किंवा 200 | 200 |
| 2 | तलाठी | सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक 13 जून 2018 मध्ये नमूद केल्याप्रमाणे | 100 किंवा 200 | 200 |
| 3 | शिपाई | वस्तुनिष्ठ बहूपर्यायी स्वरुपाचे किमान शैक्षणीक अर्हतेच्या स्तरावरील 50 प्रश्न 100 गुणांकरिता विचारले जातील. | | |

## 11. इतर महत्वाच्या सुचना :-

1. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रानिमं2010/209/प्र.क्र.66/10/13-अ, दिनांक 19 जून, 2010 अन्वये उमेदवारांनी उत्तरे लिहिण्यासाठी अथवा चिन्हांकीत करण्यासाठी फक्त काळ्या शाईच्या बॉलपेनचाच वापर करावा.
2. लेखी परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या अधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करून द्यावी लागतील. अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार

फोन क्र.02442/222604 ई-मेल:- bmkamble.rdcbeed@gmail.com फॅक्स क्र.02442/222011


केला जाणार नाही. कागदपत्र पडताळणीसाठी उमेदवार गैरहजर राहील्यास उमेदवाराची निवड करण्यासाठी कोणताही विचार करण्यात येणार नाही.

3. वरील सर्व पदासाठी गुणवत्ता यादीत अंतर्भाव करण्यासाठी उमेदवारांनी एकूण गुणांच्या किमान 45% गुण प्राप्त करणे आवश्यक राहील.
4. वर नमूद प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करावा लागेल.
5. लेखी परीक्षेस बसलेल्या उमेदवारांना त्यांना मिळालेल्या गुणांची यादी www.beed.gov.in या संकेतस्थळावर जाहीर केली जाईल या गुणवत्ता यादीतून सामाजिक/समांतर आरक्षणनिहाय अंतरिम गुणवत्ता यादी उक्त संकेतस्थळावर जाहीर केली जाईल.
6. परीक्षेत ज्या उमेदवारांना समान गुण असतील, अशा अमेदवारांचा गुणवत्ताक्रम सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय दि. 13/07/2018 मधील नमूद निकषावर क्रम लावला जाईल.
7. वरील गुणवत्ता यादीमधील गुणानुक्रमे पात्र व आरक्षण विचारात घेवून कागदपत्र पडताळणीसाठी पात्र करण्यात आलेल्या उमेदवारांनी संकेतस्थळावर दिलेल्या सुचनानुसार त्यांच्या कागदपत्र छाननीसाठी ठरवून दिलेल्या दिनांकास, वेळेवर व ठरवून दिलेल्या ठिकाणी मूळ कागदपत्रे व साक्षांकित प्रतीसह उपस्थित राहणे आवश्यक राहील. सदर दिवशी वेळेत व ठिकाणी सदर उमेदवार कागदपत्र छाननीसाठी अनुपस्थित राहील्यास त्यांचे निवडीबाबत जिल्हा निवड समिती विचार करणार नाही. व कागदपत्र पडताळणीच्या दिनांकापासुन सात दिवसाच्या नंतर गुणवत्तेप्रमाणे पुढील उमेदवाराचा नियुक्ती देण्याबाबत विचार करण्यात येईल. आणि याबाबत गैरहजर उमेदवारास त्याच्या निवडीबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.
8. सदर भरतीचे नियम/निकषामध्ये पदभरती पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी निर्गमित होणा-या शासन निर्णय/परिपत्रक/अधिसूचना यानुसार बदल होऊ शकतो.
9. अर्ज भरतांना चुकने,परिक्षेस बसण्यास अपात्र झाल्यास, अनेक पदांसाठी स्वतंत्र शुल्क भरलेले,किंवा अन्य कारणामुळे अपात्र झाल्यास कोणतेही परिक्षा शुल्क उमेदवारांस परत मिळणार नाही.
10. लेखी परिक्षा बीड जिल्हा केंद्रावर घेण्यात येईल. परंतू, उमेदवारांची संख्या जास्त असल्यास अन्य तालुक्यातील उपकेंद्रावर घेण्यात येईल.
11. जाहिरातीमधील काही मुद्दे शासन निर्णयाच्या विसंगत असल्यास शासन निर्णय अंतिम राहील.
12. **भरती प्रक्रियेचा कार्यक्रम:-**

| अ.क्र. | भरती प्रक्रीया कार्यक्रम | संभावित दिनांक |
|---|---|---|
| 1 | जाहिरात प्रसिध्दी दिनांक | दिनांक 28/12/2019 |
| 2 | अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयात ऑफलाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी | दिनांक 06/01/2020 सायं 5.45 वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) |
| 4 | लेखी परीक्षेसाठी प्रवेशपत्र उपलब्ध होण्याचा कालावधी (सर्व संवर्गासाठी) | दि.09/01/2020 ते दि. 11/01/2020 पर्यंत कार्यालयीन वेळेत. |

13. **परिक्षेचे वेळापत्रक:-**

| अ.क्र. | संवर्ग | लेखी परिक्षा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| 1 | लिपिक-टंकलेखक | रविवार 12/01/2020 | सकाळी 11.00 ते दुपारी 01.00 |
| 2 | शिपाई | रविवार 12/01/2020 | दुपारी 03.00 ते 04.30 |
| 3 | तलाठी | सोमवार 13/01/2020 | सकाळी 11.00 ते दुपारी 01.00 |

14. **महत्वाची सुचना:-**

उमेदवाराने अर्जासोबत माहिती सादर करतांना सतत कार्यान्वीत असलेला भ्रमणध्वनी (मोबाईल क्रमांक), ई-मेल आयडी व अद्ययावत पत्ता नमुद करावा. या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळाला (www.beed.gov.in) भरती

*जिल्हाधिकारी कार्यालय, बीड (आस्थापना शाखा)*

*फोन क्र.02442/222604* *ई-मेल:-* bmkamble.rdcbeed@gmail.com *फॅक्स क्र.02442/222011*

---

प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेच्या माहितीबाबत व टप्प्याबाबत अद्यावत राहण्याची जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. याबाबत अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी बीड हे जबाबदार असणार नाहीत.

15. **अर्जदार यांना अर्ज भरण्याबाबत/परिक्षेच्या अनुषंगाने/प्रवेशपत्राबाबत काही अडचणी आल्यास दूरध्वनी क्रमांक** 02442-222604 **यावर संपर्क साधावा.**

**(अजित कुंभार)**
**जिल्हाधिकारी बीड तथा**
**अध्यक्ष जिल्हा निवड समिती बीड**

**दिनांक :** 27/12/2019
**स्थळ :- बीड**